तुम्हाला माहित आहे का?

# मुलांना देखील हक्क असतात !



मला काय वाटतं
ते बोलण्याचा आहे मला हक्क





मला आहे जगण्याचा हक्क,
''मी'' होण्याचा हक्क





मला आहे, माझ्या घरी राहण्याचा हक्क

माझ्याशी संबंधित सर्व गोष्टींची
माहिती मिळण्याचा हक्क

सहाय्य : AEI Through TDH Pune    साभार : मुलांचे हक्क, निर्मिती – इंडिया स्पॉन्सरशिप कमिटी, आर्क आणि युनिसेफ

निर्मिती : ग्रामीण महिला विकास संस्था
विवेक वर्धिनी महाविद्यालयाजवळ,
पावर हाऊस रोड, देवनी, तालुका देवणी,
जि. लातूर-४१३५१९ फोन : ०२३८५-२६९९२९
ईमेल : gmvsdeoni @gmail .com
वेबसाईट : www.gmvsdeoni.org

*बाल हक्काचे संरक्षण, आहे प्रगत समाजाचे लक्षण.*

*बाल हक्कांचे संरक्षण ही प्रत्येक देश, संस्था आणि प्रौढ व्यक्तींची जबाबदारी आहे.*


तथापि ट्रस्ट,
२०१७



### तुम्हाला माहित आहे का?

# मुलांना देखील हक्क असतात !

**भयंकर शिक्षेपासून संरक्षण मिळण्याचा हक्क**





**माझ्या तब्येतीची चांगली काळजी घेतली गेलीच पाहिजे हा हक्क**

**अपंग असले, तर विशेष मदत मिळण्याचा हक्क**





**पोटभर अन्न, अंगभर कपडा, आणि रहायला घर, हे तर हवंच हवं.**

सहाय्य : AEI Through TDH Pune    साभार : मुलांचे हक्क, निर्मिती – इंडिया स्पॉन्सरशिप कमिटी, आर्क आणि युनिसेफ

निर्मिती : ग्रामीण महिला विकास संस्था
विवेक वर्धिनी महाविद्यालयाजवळ,
पावर हाऊस रोड, देवनी, तालुका देवणी,
जि. लातूर–४१३५१९ फोन : ०२३८५–२६९९२९
ईमेल : gmvsdeoni @gmail .com
वेबसाईट : www.gmvsdeoni.org

*बाल हक्काचे संरक्षण, आहे प्रगत समाजाचे लक्षण.*

*बाल हक्कांचे संरक्षण ही प्रत्येक देश, संस्था आणि प्रौढ व्यक्तींची जबाबदारी आहे.*

तथापि ट्रस्ट,
२०१७

### तुम्हाला माहित आहे का?

# मुलांना देखील हक्क असतात !





शिकण्याचा हक्क



माझी भाषा, माझा धर्म
माझी संस्कृती,
या नुसार जगण्याचा हक्क



कधी कधी गम्मत जम्मत,
खेळ आणि विसावा हाही माझा हक्क



गैरफायदा घेणाऱ्या लोकांपासून
संरक्षणाचा हक्क

सहाय्य : AEI Through TDH Pune   साभार : मुलांचे हक्क, निर्मिती – इंडिया स्पॉन्सरशिप कमिटी, आर्क आणि युनिसेफ

**निर्मिती : ग्रामीण महिला विकास संस्था**
विवेक वर्धिनी महाविद्यालयाजवळ,
पावर हाऊस रोड, देवनी, तालुका देवणी,
जि. लातूर–४१३५१९ फोन : ०२३८५–२६९९२९
ईमेल : gmvsdeoni @gmail .com
वेबसाईट : www.gmvsdeoni.org

*बाल हक्काचे संरक्षण, आहे प्रगत समाजाचे लक्षण.*
*बाल हक्कांचे संरक्षण ही प्रत्येक देश, संस्था आणि प्रौढ व्यक्तींची जबाबदारी आहे.*

तथापि ट्रस्ट,
२०१७

# बाल हक्कांची सनद



प्रिय मुलांनो,

२० नोव्हेंबर १९९० रोजी संयुक्त राष्ट्र परिषदेच्या सर्वसाधारण सभेत बाल हक्कांची ही सनद मंजूर केली गेली.

या सनदेतील हक्क प्रत्येक मुलाला मिळायलाच हवा, जीवनात प्रत्येकाला त्या हक्कांचा उपयोग व्हायलाच हवा. तुम्हा सर्व मुलांना समान हक्क आहेत आणि माहित आहे का, विश्वातील जवळपास सर्वच देशांनी या हक्कांना मान्यता दिली आहे. खरं पाहता हे सर्व हक्क एकमेकांशी निगडीत आहेत शिवाय प्रत्येक हक्क तेवढाच महत्वपूर्ण आहे.

बाल हक्कांच्या या सनदेचा हा सारांश तुमच्यासाठी तयार केला आहे. तुमचे पालक, शिक्षक किंवा तुमच्या भागात, गावात काम करणाऱ्या संस्थेच्या ताई/दादाशी बोलून या हक्कांविषयी अधिक माहिती तुम्हाला मिळवता येईल..

**कलम १-** हे हक्क १८ वर्षापर्यंतच्या प्रत्येक मुलाला प्राप्त झालेले आहेत.

**कलम २-** हे हक्क तुम्हाला मिळायलाच हवेत. त्यात वंश, लिंग, धर्म, वर्ग, भाषा, क्षमता, पालकांची संस्कृती/श्रद्धा अथवा राजकीय मते इत्यादी गोष्टींवर आधारित कुठलाही भेदभाव केला जाणार नाही.

**कलम ३-** मुलांसंबंधी कुठलाही निर्णय घेताना सर्व प्रौढ व्यक्ती, संस्था आणि शासन यांनी मुलांचे सर्वोत्तम हित जपणे महत्वाचे आहे.

**कलम ४-** मुलांना हे हक्क मिळवून देणे प्रत्येक देशाचे कर्तव्य आहे.

**कलम ५-** तुमचे हे हक्क तुम्हाला मिळावेत, त्याचा उपयोग व्हावा म्हणून प्रयत्न कारण्याचा तुमच्या कुटुंबाला अधिकार आहे आणि ती त्यांची जबाबदारी आहे. त्यासाठी शासनही जबाबदार आहे.

**कलम ६-** तुम्हा प्रत्येकाला जगण्याचा आणि आरोग्यपूर्ण विकासाचा हक्क आहे.

**कलम ७-** शासनाकडून तुमचे नाव, राष्ट्रीयत्व मिळण्याचा अधिकार जपला जाईल. आपल्या आई वडीलांविषयी माहित असणे आणि त्यांच्याकडून तुमचे पालनपोषण केलं जाणे हा तुमचा हक्क आहे.

**कलम ८-** तुम्हाला आपले नाव, ओळख, नाती जपण्याचा, कायम ठेवण्याचा हक्क आहे. कुठलेही राष्ट्र त्यात बेकायदेशीर ढवळाढवळ करणार नाही.

**कलम ९-** मुलांना आपल्या आई बाबांसोबत, काळजी घेणाऱ्या कुटुंबासोबत राहण्याचा हक्क आहे. अर्थात ते तुमच्यासाठी योग्य नसेल तर दुसऱ्या सुरक्षित आणि काळजी घेणाऱ्या कुटुंबासमवेत रहायला मिळण्याचा तुमचा अधिकार आहे.

**कलम १०-** आपल्या आई किंवा वडिलांपासून दूर, निराळ्या देशात रहात असलेल्या मुलांना पालकांसोबत एकत्र राहण्यासाठी त्या त्या देशात जाण्या येण्याची मुभा आहे आणि हे सर्व देशांना मान्य आहे.

**कलम ११-** मुलांना बेकायदेशीररीत्या परदेशी पाठवणे अथवा अपहरण करणे ह्याला सर्व राष्ट्रे कडक प्रतिबंध करतील.

**कलम १२-** मुलांना आपलं मत असण्याचा आणि ते मांडण्याचा हक्क आहे. इतर व्यक्ती, संस्था मुलांना तशी संधी देतील आणि ते मुलांचे मत गांभीर्याने विचारात घेतील.

**कलम १३-** माहिती मिळवण्याचा आणि त्यातून एखाद्या व्यक्तीचे अथवा देशाचे अहित होणार नसेल तर त्या माहितीची देवाणघेवाण करण्याचा तुम्हाला हक्क आहे.

**कलम १४-** तुम्हाला विचार स्वातंत्र्याचा, आपला विवेक वापरण्याचा व कुठलाही धर्म मानण्याचा हक्क सर्व राष्ट्र मान्य करतील. पालक तुम्हाला त्यात मदत करतील.

**कलम १५-** तुम्ही तुमचे मित्र, समूह-संघटना बनवू शकता, इतरांचे अधिकार बाधित होणार नाहीत अशा पद्धतीने त्यात सहभागी होऊ शकता.

**कलम १६-** तुमच्या खाजगी आयुष्यात कुठल्याही प्रकारची ढवळाढवळ करण्याचा कुणालाही अधिकार नाही. त्याविरुध्द संरक्षणाचा तुम्हाला हक्क आहे.

**कलम १७-** माध्यमांचा वापर करण्याचा, माहिती मिळवण्याचा तुम्हाला हक्क आहे. उपयुक्त माहिती देणारी माध्यमं उपलब्ध करून देण्याची जबाबदारी देशांची आहे.



**कलम १८-** मुलांचे पालन पोषण करण्याची जबाबदारी (शक्य तोवर) आई वडिलांची आहे. शासन त्यात त्यांना, विशेषतः दोन्ही पालक नोकरी करत असतील तर मदत करेल.

**कलम १९-** शारीरिक मानसिक आघात, वाईट वागणूक, शोषणापासून संरक्षणाचा हक्क तुम्हाला आहे.

**कलम २०-** तुम्ही जर तुमच्या कुटुंबापासून काही कारणाने दूर/विभक्त झाला असाल तर तुम्हाला मदत मिळेल आणि तुमची काळजी घेतली जाईल.

**कलम २१-** मूल दत्तक देताना किंवा मुलासाठी निराळे पालक शोधताना (देशात अथवा परदेशात) मुलाच्या हिताला आणि सुरक्षेलाच प्राधान्य दिले जाईल.

**कलम २२-** निर्वासित, परागंदा व्हावे लागलेल्या मुलांना विशेष काळजी आणि मदतीचा हक्क आहे. त्यांना या सनदेतील सर्व हक्क लागू आहेत.

**कलम २३-** कसल्याही प्रकारचे अपंगत्व असलेल्या मुलांना एक समृध्द आयुष्य जगता यावे म्हणून शिक्षण आणि विकासाच्या संधी प्रामुख्याने मिळतील याची विशेष काळजी घेतली जाईल.

प्रस्तुत पोस्टरसाठी 'बालकांचे हक्क'-अनुवाद डॉ. शांता वैद्य, निर्मिती युनिसेफ आणि इंटरनेट वर उपलब्ध युनिसेफच्याच अनेक संसाधनांची मदत झाली. चित्र : 'मुलांचे हक्क'- इंडिया स्पॉन्सरशिप कमिटी, आर्क आणि युनिसेफ त्यांचे आभार.

**कलम २४-** निरोगी जीवनाच्या दृष्टीने आरोग्याच्या सोयी, शुध्द पाणी, पोषक आहार, स्वच्छ आणि सुरक्षित पर्यावरण मिळण्याचा मुलांचा हक्क सर्व देशांना मान्य असेल आणि त्याची पूर्तता करण्याची त्यांची जबाबदारी असेल.

**कलम २५-** मुलं कुटुंब सोडून इतर कुणाच्या देखरेखीखाली किंवा उपचारांसाठी राहत असतील तर अशा वेळी तिथल्या गोष्टींची नियमित फेरतपासणी होण्याचा हक्क मुलांना आहे.

**कलम २६-** शासनाकडून आवश्यक ती सर्व आर्थिक, सामाजिक सुरक्षा मिळवण्याचा हक्क मुलांना आहे.

**कलम २७-** उत्तम जीवनमानात वाढण्यासाठी अन्न, वस्त्र आणि सुरक्षित निवाऱ्या सारख्या सर्व मुलभूत गरजांची कुटुंब आणि शासनाकडून पूर्तता केली जाण्याचा हक्क मुलांना आहे.

**कलम २८-** गुणवत्तापूर्ण, कौशल्य केन्द्री, समान आणि मोफत शिक्षणाचा हक्क मुलांना आहे. शिस्तीच्या नावाखाली मुलांची मानहानी होणार नाही. हव्या त्या आणि हव्या तितक्या उच्च शिक्षणातून आपला विकास साधण्याची संधी मिळेल.

**कलम २९-** प प्रत्येक मुलाला बुद्धिमत्ता आणि क्षमता वृद्धिंगत करणारे शिक्षण मिळायला हवे. समता, शांतता, मानवी हक्क, स्वातंत्र्य, इतर संस्कृती, भाषा आणि ज्येष्ठ व्यक्ती यांच्या बद्दल आपुलकी आणि आदर ही मूल्य जोपासणारे शिक्षण मिळण्याचा हक्क तुम्हाला आहे.

**कलम ३०-** आपला धर्म, भाषा, संस्कृतीनुरूप वागण्याचा सर्व मुलांना, विशेषतः अल्पसंख्याक गट-समूहातील मुलांना, हक्क आहे.

**कलम ३१-** मित्रांनो, तुम्हाला आवडीचे खेळ खेळण्याचा, करमणुकीचा, मोकळा वेळ असण्याचा आणि हो, विश्रांती घेण्याचा हक्क आहे.

**कलम ३२-** आर्थिक शोषणापासून सुरक्षेचा, कुठल्याही धोकादायक, हानिकारक, शिक्षणाच्या आड येणाऱ्या कामापासून संरक्षण मिळण्याचा हक्क तुम्हाला आहे.

**कलम ३३-** अमली पदार्थ आणि त्यांच्या व्यापारापासून संरक्षणाचा हक्क तुम्हाला आहे.

**कलम ३४-** लैंगिक शोषणापासून अगर लैंगिक गैर प्रकारापासून संरक्षणाचा हक्क तुम्हाला आहे.

**कलम ३५-** कोणत्याची स्वरुपात किंवा कारणाकरिता मुले पळविणे, त्यांची विक्री करणे ह्याला कायद्याने बंदी असेल.

**कलम ३६-** तुमच्या आरोग्याच्या कोणत्याही प्रकारे आड येणाऱ्या सर्व प्रकारच्या शोषणापासून संरक्षणाचा हक्क तुम्हाला आहे.

**कलम ३७ -**मुलांना क्रूर अथवा हानिकारक शिक्षा करण्याचा कोणालाही अधिकार नाही. मुलांना ताब्यात घ्यायचे असेल तर त्यांना ताबडतोब कायद्याची मदत मिळण्याचा हक्क आहे.

**कलम ३८-** युद्धापासून संरक्षण आणि स्वातंत्र्य प्रत्येक मुलाचा अधिकार आहे. १५ वर्षांखालील मुलांची सैन्यात भरती केली जाणार नाही.

**कलम ३९-** अनास्था, शोषण, क्रूर आणि अमानुष वागणूकीचे बळी ठरलेल्या मुलांना तत्काळ मदत मिळायला हवी.

**कलम ४०-** कायदा भंगाचा ज्यांच्यावर आरोप आहे अशा मुलांना न्यायालयीन यंत्रणेकडून न्यायपूर्ण वागणूक मिळण्याचा, आपली बाजू मांडण्यासाठी तत्काळ कायदेशीर मदत मिळण्याचा आणि मुलांचे हक्क अबाधित राखले जाण्याचा हक्क आहे.

**कलम ४१-** मुलांच्या हक्कांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने ह्या संहितेहून अधिक योग्य तरतुदी एखाद्या देशाच्या कायद्यात असतील तर तिथे ते कायदे लागू व्हावेत.

**कलम ४२-** तुम्हाला तुमचे हक्क माहित असण्याचा, जाणून घेण्याचा हक्क आहे. प्रौढ व्यक्तींनी देखील ह्या हक्कांची माहिती घ्यावी, ते मिळवण्यात मुलांना मदत करावी. शासनाने ही सनद प्रत्येक मूल आणि प्रौढ व्यक्तींपर्यंत पोचवावी.

**कलम ४३ ते ५४-** बाल हक्कांच्या सनदेत एकूण ५४ कलम आहेत. ४३ ते ५४ ही कलमं मुख्यतः शासन, सामाजिक संस्था आणि प्रौढ व्यक्तींनी एकत्र येऊन बाल हक्कांच्या संरक्षणाच्या दृष्टीने कशी आणि कोणती पावलं उचलावीत यांविषयी बोलतात.

प्रिय मुलानो,

ज्या प्रमाणे ही बाल हक्कंची सनद मुलांच्या हक्कांविषयी बोलते त्याच प्रमाणे मुलांवर असलेल्या जबाबदाऱ्याही (कलम २९) ती सांगते.

माणसांमधल्या विविधतेचा आदर, सर्वांना समान वागणूक देणे, पर्यावरणाची काळजी घेणे, ज्ञान आणि अनुभवांची मुक्त देवाण घेवाण करणे, अन्यायकारक वागणूक मिळालेल्या मुलांची आणि प्रौढांची मदत करणे, इतरांच्या श्रद्धा आणि परंपरांचा आदर करणे ह्या त्या जबाबदऱ्या आहेत..

तुम्हाला आणखीही काही सुचतात का ते पहा...

सनद ही अनेक राष्ट्रांनी मिळून परस्परांशी केलेला हा एक करार असतो; ज्याचा आदर प्रत्येक देशाने आपली धोरणं आणि कायद्यांच्या द्वारे करणे अपेक्षित आहे. आपल्या देशाने, भारतानेही ह्या करारावर स्वाक्षरी केली आणि तिचा स्वीकार केला आहे. ह्याचा अर्थ हा आहे की सनदेतील प्रत्येक हक्क आपल्या देशातील मुलांना मिळेल याची खबरदारी भारत देशाला घ्यावी लागेल.

सहाय्य : AEI Through TDH Pune

निर्मिती : ग्रामीण महिला विकास संस्था
विवेक वर्धिनी महाविद्यालयाजवळ,
पावर हाऊस रोड, देवनी, तालुका देवणी,
जि. लातूर-४१३५१९ फोन : ०२३८५-२६९९२९
ईमेल : gmvsdeoni @gmail .com
वेबसाईट : www.gmvsdeoni.org

***बाल हक्काचे संरक्षण, आहे प्रगत समाजाचे लक्षण.***

***बाल हक्कांचे संरक्षण ही प्रत्येक देश, संस्था आणि प्रौढ व्यक्तींची जबाबदारी आहे.***

संपादन :
तथापि ट्रस्ट,
पुणे